कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे ॥

## पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# राज्यशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल 2024-25


सादरकर्ते

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

डॉ. रामकिशन लोमटे

# अनुक्रमणिका


| अ .क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | भित्तीपत्रक प्रकाशन | ३ |
| २ | अतिथी व्याख्यान पहिले | ३ |
| ३ | महात्मा गांधी व लालबहाद्दूरशास्त्री यांची जयंती | ४ |
| ४ | भित्तीपत्रक प्रकाशन | ५ |
| ५ | अतिथी व्याख्यान दुसरे | ५ |
| ६ | अभ्यास सहल | ६-७ |
| ७ | विद्यार्थी चर्चासत्र | ७ |
| ८ | नेतृत्व विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम | ८ |

## १. भित्तीपत्रक प्रकाशन:-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बनविलेले ‘भारताचे राष्ट्रीय प्रतीके’ या भित्तीपत्रकाचे दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्य दिनाचे प्रमुख अतिथी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे, बाबासाहेब लहाने, प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे, क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप व विद्यार्थी कु. कावेरी तावडे व आदित्य वाघ हे उपस्थित होते.



भित्तीपत्रक प्रकाशित करताना श्री अनिल दुतोंडे, बाबासाहेब लहाने, प्राचार्य डॉ. सुभाष टकले

## २.अतिथी व्याख्यान पहिले:-

शिक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम सत्रात राज्यशास्त्र विभागात दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी वक्ते प्रा. डॉ. किरण धनेधर यांचे ‘मुलभूत अधिकार’ या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले होते.




अतिथी व्याख्यान देताना वक्ते प्रा.डॉ. किरण धनेधर

## ३. महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री यांची जयंती:

महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री यांची जयंती दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रथम महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने प्रा. डॉ. भरत कुबेर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे होते.



प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.



व्याख्यान देताना प्रा. भरत कुबेर

## ४. भित्तीपत्रक प्रकाशन:-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बनविलेले 'महाराष्ट्र विधानसभा' हे भित्तीपत्रक दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी गणतंत्र दिनाचे प्रमुख अतिथी श्री योगेश मिसाळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे, प्रमुख वक्ते डॉ. प्रभाकर जगताप, प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे, ग्रंथपाल डॉ. गणेश कुलकर्णी व विद्यार्थीनी कु. कावेरी तावडे व कु.शिवानी जाधव हे उपस्थित होते.



## ५. अतिथी व्याख्यान दुसरे :-

शिक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये द्वितीय सत्रात राज्यशास्त्र विभागात दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी अतिथी व्याखाते डॉ. पंडित नलावडे (ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव) यांचे 'मुलभूत अधिकार व कर्तव्य' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले.




अतिथी व्याखान देताना डॉ. पंडित नलावडे

## ६. अभ्यास सहल :-

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता पंचायत समिती फुलंब्री येथे अभ्यास सहल काढण्यात आली. यावेळी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती उषा मोरे, श्री महाजन साहेब, श्री घुगे साहेब, श्री गायकवाड साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी व इतर अधिकारी यांच्यासोबत महाविद्यालयाचे विद्यार्थी




पंचायत समिती अधिकारी व महाविद्यालयाचे विद्यार्थी



विद्यार्थ्यांना माहिती सांगताना पंचायत समिती अधिकारी श्री घुगे साहेब

## ७. विद्यार्थी चर्चासत्र :-

राज्यशास्त्र विभागात दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० ते १०:५० या वेळेत ‘भारतीय लोकशाही व मतदार’ या विषयावर विद्यार्थ्यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात २१ विद्यार्थी सहभागी झाले.




विद्यार्थी चर्चासत्रात मार्गदर्शन करताना डॉ. रामकिशन लोमटे

## ८. नेतृत्व विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम:-

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 27 जानेवारी 2025 ते 4 फेब्रुवारी 2025 या कालावधीत नेतृत्व विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविण्यात आला. अभ्यासक्रमासाठी 20 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. अभ्यासक्रमाचे उद्घाटन संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पंडित नलावडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी साधन व्यक्ती म्हणून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवला. अभ्यासक्रमामध्ये विविध विषयावरची व्याख्याने व प्रात्यक्षिके झाली. त्याबरोबरच राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. किरण धनेधर यांनीही विद्यार्थ्यांना अध्यापनाचे कार्य केले. याबरोबरच श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राज्यशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्रा. भरत कुबेर यांनीही अध्यापनाचे कार्य केले. या अभ्यासक्रमाचे समन्वयक व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे यांनी सुद्धा अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर विद्यार्थ्यांची 30 गुणाची लेखी परीक्षा घेण्यात आली व २० गुणाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यानंतर एक दिवसाची सहल आयोजित करण्यात आली. पंचायत समिती कार्यालय फुलंब्री येथे विद्यार्थ्यांना घेऊन सहल काढण्यात आली. पंचायत समिती बाबतची सर्व माहिती या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात आली. या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र वाटप प्राचार्य डॉ. सुभाष टकले, डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. अश्विन राजनीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत ही व्यक्त केले.




डॉ. पंडित नलावडे विद्यार्थ्यांना नेतृत्व विकास अभ्यासक्रम शिकवताना

= ० =